Indian Journal of Social Sciences and Literature Studies
Vol. 8, Issue 2, April 2022
ISSN 2349-5634 (Print) ISSN 2455-0973 (online)

# ऑंग सान स्यू की: शांतीच्या अग्रदूत कि नरसंहारक ?

प्रा.अरुण वाहुळ
इतिहास विभाग,
विवेकानंद महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर,
महाराष्ट्र

ऑंग सान स्यू की या नावाला आज तशी परिचयाची गरज नाही. म्यानमारमधील लोकशाही संघर्षासाठी १७ वर्ष स्थानबद्ध राहून लोकशाही स्थापनेसाठी प्रयत्न करणाऱ्या स्यू की, मागच्या काही दिवसापासून वेगळ्या कारणांनी चर्चेत आहेत, कारण आहे रोहिंग्या मुस्लीम. २०१६ साली रोहिंग्या मुस्लिमाच्या विरोधामध्ये लष्कराने केलेल्या हिंसाचारात हजारो रोहिंग्याची हत्या करण्यात आली तर लाखो रोहिंग्याना म्यानमार मधून हाकलून दिले होते. म्यानमारच्या लष्कराने या कृतीस वांशिक शुद्धी नाव दिले होते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय समुदायाने या घटनेची दाखल घेऊन लष्करच्या कृतीला नरसंहार नाव दिले. रोहिंग्या मुस्लीमावर होत असलेल्या हिंसाचारा बाबत स्यू की च्या भुमिके बद्दल अनेक लोकांनी त्यांच्यावर टीका केली, काही लोकांनी तर त्यांना मिळालेल्या नोबेल पुरस्कार मागे घेण्याची मागणी केली. स्यू की ने रोहिंग्याना वाचविण्यासाठी काही केले नाही तर उलट लष्करच्या कृतीचे समर्थन केले त्यामुळे रोहिंग्याच्या नरसंहारास त्याच जबाबदार आहेत असा आरोप ठेऊन आंतरराष्ट्रीय न्यालायामध्ये त्यांच्यावर खटला चालविण्यात आला. या खटल्याच्या माधमातून स्यू की च्या भूमिकेवर चर्चा सुरु झाली. म्यानमार मध्ये स्यू की ना पाठींबा देणाऱ्यानी मोर्चे काढले, तर म्यानमारच्या बाहेर नरसंहाराच्या खटल्याचे समर्थन सुरु झाले. पण स्यू की चा खरच या नरसंहारामध्ये काही हात होता का याची शहानिशा करणे गरजेचे आहे.

रोहिंग्याच्या विरोधामध्ये सुरु असलेल्या हिंसाचारास ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. स्यू की चा पक्ष (एन.एल.डी) सत्तेवर आल्यापासून तो तयार झाले असे नाही. त्यांचा पक्ष सत्तेवर येण्या अगोदर रोहिंग्या-बौद्ध संघर्ष सुरु होता. ९६९ च्या चळवळीने म्यानमार मध्ये रोहिंग्याच्या विरोधामध्ये वातावरण तयार केले होते.[१] २०१० साली म्यानमार मध्ये निवडणुका झाल्या तेंव्हा एन.एल.डीने त्यावर बहिष्कार टाकला होता, तेंव्हा स्यू की स्थानबद्ध होत्या. लष्कराने स्वतः चा राजकीय पक्ष स्थापन करून निवडणुकीमध्ये बळाचा वापर करून निवडणुकाचा निकाल त्यांच्या पक्षाच्या बाजूने वळविला होता. निवडणूक झाल्यानंतर लष्कराने स्यू की ची सुटका केली. लष्कराने लोकशाहीच्या नावाने सरकार स्थापन केले. पण हे सरकार नावाला लोकशाहीचे होते. लष्करातील काही काही लोकांनी लष्करी गणवेश बाजूला ठेऊन मुलकी वेश परिधान केला होता. पण खरी शक्ती लष्कराच्या हाती होती. २०१०च्या निवडणुका २००८ च्या राज्यघटनेनुसार झाल्या होत्या. २००८ च्या राज्यघटनेची निर्मितीच स्यू की ना सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी व लष्कराचा प्रभाव राष्ट्रीय राजकारणामध्ये अभाधित ठेवण्यासठी करण्यात आली होती. या राज्यघटनेनुसार ज्या व्यक्तीने २० वर्ष म्यानमारच्या बाहेर वास्तव्य केले असेल, ज्या व्यक्तीने परकीय व्यक्ती सोबत विवाह केले असेल त्यांना देशात कोणतेही घटनात्मक पद मिळणार नाही. तसेच संसदेच्या दोन्ही सभागृहात २५ % जागा लष्करासाठी राखीव ठेवण्यात असतील, कोणतीही घटनादुरुस्ती करावयाची असल्यास त्यास लष्कराची मंजुरी आवश्यक असेल.[२] अशा तरतुदी करून लष्कराने स्यू की ना सत्तेपासून दूर ठेवण्याचा पर्यन्त केला होता.

लष्करास याची पूर्ण कल्पना होती कि म्यानमारची जनता स्यू की पाठी मागे आहे, त्यामुळे त्यांनी त्यांच्या मार्गात घटनात्मक पेच निर्माण करून त्यांना अडवण्याचा पर्यन्त केला. घटनात्मक पेचा बरोबर देशातील बहुसंख्य लोकांना स्यू की विरोध मध्ये उभे करण्यासाठी कट्टर भिक्षु आशिन विर्थू यास २०१० लाच तुरुंगातून त्याची शिक्षा पूर्ण होण्याआधीच मुक्त करण्यात आले.[3] (त्यास २००३ साली रोहिंग्या हत्याकांडात दोषी ठरून २५ वर्षाची शिक्षा झाली होती.) आशिन विर्थू यांनी बाहेर येताच पुन्हा रोहिंग्याच्या विरोधामध्ये बोलणे सुरु केले. “म्यानमारचा बौद्ध धर्म रोहिंग्यामुळे धोक्यात आहे, त्यांना अडवण्यासाठी देशात शक्तिशाली सरकारची गरज आहे, देशाच्या बाहेर राहिलेल्या लोकांच्या (स्यू की) हाती सत्ता गेल्यास ते रोहिंग्याना रोखू शकणार नाही.” आशिन विर्थूची ही भूमिका स्यू की च्या विरोधात होती.[४] २०१२ साली देशात ४५ जागासाठी पोटनिवडणूक झाली या निवडणुकीमध्ये एन.एल.डीला ४३ जगावर विजय मिळाला.

स्यू की पण विजयी होऊन संसदे पोहोचल्या, तेंव्हा संसदेमध्ये लष्करी वेशात बसलेले लोक होते. स्यू की चा विजय हा लष्करासाठी चांगला संदेश नव्हता. भविष्यातील धोका ओळखून स्यू की चा पाठींबा कमी करण्यासाठी रोहिंग्याचा प्रश्न बाहेर काढण्यात आला. २०१२ साली एका बौद्ध महिले वर बलात्कार झाला त्यात कोणत्या रोहिंग्याचा समावेश नसताना ही आशिन विर्थूने रोहिंग्याच्या विरोधामध्ये मोहीम उघडली व त्यांना म्यानमारच्या भूमीच्या बाहेर काढणे सुरु केले. यात त्यांना लष्कराचा पाठींबा मिळाला होता. स्यू की ना या मागची कल्पना असल्यामुळे त्यांनी यावर प्रतिक्रिया दिली नाही.

२०१५ साली म्यानमारमध्ये निवडणूक झाली त्यात एन.एल.डीला बहुमत मिळाले, लष्कराच्या पक्षाचा पराभव झाला. पण स्यू की देशाचे नेतृत्व करू शकत नव्हत्या (२००८ च्या राज्यघटनेच्या तरतुदी).लष्कराने सत्ता गेल्यानंतर आशिन विर्थूला पाठींबा देऊन रोहिंग्या समस्या जिवंत ठेवण्याचा प्रयास केला. लष्कराची सत्ता गेली जरी असली तरी देशाला लष्कराचे महत्त्व पटावे म्हणून रोहिंग्याचा धोका दूर करण्यासठी लष्कर किती महत्वाचे होते याचा प्रचार आशिन विर्थूने सुरु केला.[५] २००८ ची राज्यघटनेमुळे स्यू की व एन.एल.डी हतबल झाले होते, सत्ता हाती असतानाही लष्कर वा पोलीस त्यांच्या नियंत्रणा मध्ये नव्हते. देशातील अंतर्गत आणि बाह्य सुरक्षेची जबाबदारी लष्कराकडे होती, सरकारला त्यात हस्तक्षेप करण्याचा अधिकार नव्हता. त्यामुळे रोहिंग्याच्या समस्या सोडवण्यासाठी त्या फार करू शकत नव्हत्या. स्यू की ना देशात पूर्ण लोकशाहीची स्थापना करावयाची होती. त्यासाठी २००८ च्या राज्यघटनेमध्ये दुरुस्तीसाठी त्यांना लष्कराच्या विरोधात जाणे शक्य नव्हते.[६] २०१६ साली स्यू की नी पहिली घटना दुरुस्ती करून त्यास लष्कराचा पाठिंबा मिळून स्यू की साठी राष्ट्रीय सल्लागार पद तयार केले. असे असले तरी त्यांना लष्करा संबंधी अधिकार मिळाले नव्हते. पण बाहेरच्या राष्ट्रांना असे वाटते कि त्या जाणीव पूर्वक रोहिंग्याच्या बाजूने भूमिका घेत नाही. वास्तविक स्यू की च्या सरकारला फार मर्यादीद अधिकार आहे. जो पर्यन्त म्यानमारच्या राज्यघटनेत बदल होत नाही, जो पर्यत देशाच्या राजकारणातून लष्कराचे महत्व कमी होत नाही तो पर्यन्त रोहिंग्याचा प्रश्न सुटणे शक्य नाही. स्यू की चा प्रयत्न हा म्यानमारमध्ये शांतता निर्माण करण्याचा आहे, पण त्यासाठी म्यानमारमध्ये पूर्ण लोकशाहीची स्थापना होणे गरजेचे आहे.

संदर्भ :


१) पी कुलर, ९६९ ॲन्ड, मा बा था मुवमेंट, word press.com

२) उपरोक्त

३) जस्पर बेन्गस्तोन, ऑंग सान सु की, बायोग्राफी,२०१२, पृ १६

४) उपरोक्त २५.

५) उपरोक्त ४५

६) वेंडी लॉ योन, ऑंग सान सु की: पोलिटिशन, प्रीसनर, पेरेंट, टी.एल.सी बुक्स,२०२३, पृ ६०